# दैनिक महावृत्त

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990



Bharat Chandak

SATYA ELECTRICALS

POLYCAB Racold legrand HAVELLS L&T SWITCHGEAR INDOASIAN Finolex KOLORS USHA PHILIPS GreatWhite SIEMENS

Tapadia Market, Chain Sukh Road, Latur-413512

Ph :(O) 243678, 244458, 250776, (R) 242018

Email:satyaelectricals@rediffmail.com



लातूर वर्ष ३ रे अंक २७० वा बुधवार दि.०३ एप्रिल २०२४ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.


## जागतिक ऑटीझम दिनानिमित्त दिव्यांग विद्यार्थ्यांची प्रभातफेरीद्वारे मतदार जागृती

# पथनाट्याद्वारे मतदारांना आवाहन; १२ शाळांतील ३५० विद्यार्थ्यांचा सहभाग

लातूर : – जिल्हा निवडणूक अधिकारी कार्यालय व जिल्हा परिषदेच्या जिल्हा समाज कल्याण कार्यालयाच्यावतीने जागतिक ऑटीझम दिनानिमित्त दिव्यांग विद्यार्थ्यांची प्रभातफेरी काढण्यात आली. माध्यमातून मतदानाचे महत्व पटवून देण्यासह लोकसभा निवडणुकीत मतदान करण्याबाबत जनजागृती करण्यात आली. जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर–घुगे, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी अनमोल सागर यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती. शहरातील १२ दिव्यांग शाळेतील ३५० विद्यार्थ्यांनी विविध मतदान जनजागृतीचे फलक हाती घेवून प्रभातफेरीमध्ये सहभागी झाले होते. क्रीडा संकुलापासुन सुरू झालेल्या या प्रभातफेरीचे उदघाटन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी तथा आदर्श आचारसंहिता कक्ष नोडल अधिकारी अनमोल सागर यांनी हिरवी झेंडी दाखवून केले. यावेळी स्वीप समितीचे नोडल अधिकारी नगरपालिका प्रशासनाचे जिल्हा सहआयुक्त रामदास कोकरे, शिक्षणाधिकारी नागेश मापारी, जिल्हा समाज कल्याण अधिकारी संतोषकुमार नाईकवाडी, स्वीप कक्षाचे रामेश्वर गिल्डा यावेळी उपस्थित होते. जागतिक ऑटीझम दिनानिमित्त आयोजित ही प्रभातफेरी जिल्हा क्रीडा संकुलातून निघालेली ही प्रभात फेरी छत्रपती शिवाजी महाराज चौक मार्गे जिल्हा परिषद प्रांगणात आल्यानंतर या प्रभातफेरीचा समारोप झाला. यावेळी डॉ. योगेश निटूरकर यांनी ऑटीझम या व्यंगत्वावर मात कशी करता येईल, याविषयी माहिती दिली. यासह गरोदरपणात काय काळजी घ्यावी, तसेच विविध तपासण्या व उपचार करून यावर मात करता येईल, असे मार्गदर्शन केले. प्रभातफेरीमध्ये सहभागी विद्यार्थिनींनी यावेळी पथनाट्य सादर करीत नागरीकांना मतदानाचे आवाहन केले. प्रभातफेरीच्या यशस्वीतेसाठी जिल्हा समाज कल्याण कार्यालयातील कार्यालय अधिक्षक रामचंद्र वंगाटे, वैद्यकीय सामाजिक कार्यकर्ता राजू गायकवाड, सहाय्यक सल्लागार बाळासाहेब वाकडे यांच्यासह दिव्यांग शाळेतील मुख्याध्यापक, शिक्षक व शिक्षकेततर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.






जिल्हा परिषद इमारतीत मतदार जनजागृती थीमचे उदघाटन

जिल्हा परिषदेच्या इमारतीत उभारण्यात आलेल्या मतदार जनजागृती थीमचे उदघाटन जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर–घुगे यांनी फीत कापून केले. या थीम अंतर्गत स्वीप संकल्प, जेष्ठ नागरिक, दिव्यांग व्यक्ती मतदान जनजागृती, मतदान एक राष्ट्रीय कर्तव्य, चुनाव का पर्व देश का गर्व या संकल्पना उभारण्यात आल्या आहेत. ही थीम तयार करणारे दिव्यांग शाळेतील कला शिक्षक शहाजी बनसोडे यांचेही जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर–घुगे यांनी कौतुक केले.

प्रभात फेरीत विविध फलकांनी वेधले लक्ष

प्रभात फेरीमध्ये सहभागी मूकबधिर, गतिमंद , अंध, अस्थिव्यंग व बहुविकलांग विद्यार्थ्यांनी मतदान करण्यासाठी विविध फलके घेवून व घोषणा देवून जनजागृती केली. या विद्यार्थ्यांच्या हातातील फलकावर असलेल्या मतदानाचे महत्व विषद करणाऱ्या विविध घोषवाक्यांनी नागरिकांचे लक्ष वेधून घेतले.

# नवी मुंबई पोलिसाच काव्यसंग्रह शाईची नोंद यांना पद्मश्री दया पवार पुरस्काराने सन्मानित

नागपूर :– महाराष्ट्र राज्याची उपराजधानी असलेल्या नागपूर नगरीत सीताबर्डी येथील विदर्भ साहित्य संमेलन नथुराम, सभागृहात जागतिक आंबेडकरवादी साहित्य महामंडळाच्या वतीने दिला जाणारा राज्यस्तरीय पद्मश्री दया पवार साहित्य पुरस्कार, हा दलित साहित्यात मानाचा समजला जाणारा पुरस्कार महाराष्ट्र पोलीस दलातील नवी मुंबई गुन्हे शाखेत स्थित कार्यरत असलेले नुकतेच शासनाच्या समाजभूषण पुरस्काराने सन्मानित कवी ,साहित्यिक व विचारवंत मा. श्री उत्तम दा . तरकसे असरडोहकर यांच्या साईची नोंद या काव्यसंग्रहाला शानदार कार्यक्रमात प्रमुख पाहुणे मा. डॉक्टर श्रीपाल सबनीस (८९वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष) मा. डॉक्टर वैशाली प्रधान (प्राचार्य मिलिंद महाविद्यालय औरंगाबाद/ संभाजीनगर) डॉ. सुनील रामटेके (ज्येष्ठ नाटकार) डॉ. विद्याधर बनसोड (ज्येष्ठ साहित्यिक) डॉ. दीपककुमार खोब्रागडे (अध्यक्ष जा. आं. साहित्य महामंडळ) या उपस्थितीत मान्यवरांच्या हस्ते देऊन सन्मान करण्यात आला.

सदर पुरस्कार व सन्मान स्वीकारून कवी, साहित्यिक उत्तम दा तरकसे यांनी आपले विचार व्यक्त करून जागतिक आंबेडकरवादी साहित्य महामंडळाच्या अध्यक्षासह सर्व कार्यकारिणीचे व सदस्यांचे तसेच महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून हजारोच्या संख्येने उपस्थित राहिलेल्या रसिक व चाहता वर्ग या सर्वांचेच आभार किंवा धन्यवाद मानत न फिटणारया ऋणातच राहणे पसंत केले.



तसेच कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे डॉ. सबनीस यांनी आपले विचार मांडताना जगभरातील हुकूमशहाणे लोकशाहीचा खेळ बनवला आहे असे प्रखर मत मांडले तसेच विचार मंचावरील उपस्थित मान्यवर डॉ. प्रकाश करमाडकर (कार्याध्यक्ष) डॉ. रवींद्र तिरपुडे (सरचिटणीस) असे मान्यवर उपस्थित राहून आपले विचार मांडले तसेच कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. विलास तायडे यांनी खूप सुंदर केले व कार्यक्रमाच्या शेवटी डॉ. दीपककुमार खोब्रागडे यांनी उपस्थित सर्व मान्यवराचे व हजारोच्या संख्येने महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून उपस्थित असलेले रसिक व चाहत्या वर्गांचे आभार मानून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली

# कोटंबे यांना अमानुष्य मारहाण करणाऱ्या डॉ.घुगेवर कलम वाढवून तात्काळ अटक करा,एबीएस क्रांती फोर्सचे विशेष पोलीस महानिरीक्षकांना निवेदन

लातूर -- दलित समाजातील आनंद प्रल्हाद कोटंबे यांच्यावर डॉ. घुगे यांनी अमानुष्यपणे मारहाण करून जीवे मारून टाकण्याचा प्रयत्न केला असून डॉक्टर घुगे यांच्यावर एमआयडीसी पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आलेल्या गुन्ह्यामध्ये ३०७ ही कलम वाढवून डॉ. घुगे यांना तातडीने अटक करण्यात यावी अशी मागणी डॉ. अण्णाभाऊ साठे क्रांती सेना (एबीएस क्रांती फोर्स ) या सामाजिक संघटनेच्या वतीने विशेष पोलीस महानिरीक्षक नांदेड यांना एका निवेदनाद्वारे मागणी केली असून सदर मागणी मान्य नाही झाल्यास मातंग समाजामध्ये असंतोष पसरणार असल्याचे या निवेदनात म्हटले आहे.

अहमदपूर तालुक्यातील रोकडा सावरगाव येथील आनंद कोटंबे यांना लिफ्ट बसवण्याच्या कामाचे गुत्ते देऊन डॉ. प्रमोद घुगे यांनी जातीच्या व पैसे देणे घेण्याच्या कारणावरून अमानुष्यपने मारहाण करून जीवे मारण्याची धमकी दिली आहे.याबाबत एमआयडीसी पोलीस ठाण्यात डॉ. घुगे यांच्या विरुद्ध गुन्हा नोंद करण्यात आला असून या गुन्ह्यांमध्ये ३०७ हे कलम वाढवून डॉ. घुगे यांना अटक करण्यात यावी.तसेच तातडीने कारवाई करावी अशी मागणी डॉ. अण्णाभाऊ साठे क्रांती सेना (एबीएस क्रांती फोर्स) या सामाजिक संघटनेच्या वतीने निवेदनाद्वारे विशेष पोलीस महानिरीक्षक नांदेड यांच्याकडे करण्यात आली आहे. यावेळी डॉ अण्णाभाऊ साठे क्रांती सेनेचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ अण्णाभाऊ साठेचे नातू सचिन भाऊ साठे,प्रदेश अध्यक्ष राज क्षीरसागर,ॲड टि.न.कांबळे,सतीश कावाडे , परमेश्वर बंडेवार,पिडीताचे भाऊ अशोक कोटंबे,बालाजी कलवले,शिवाजी नुरंदे व ईतर समाज बांधव होते.





# गेल्या दहा वर्षात लातूरच्या भाजप खासदाराने सांगण्यासारखे एकही काम केले नाही माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख

लातूर /प्रतिनिधी :– लातूर लोकसभा मतदार संघातील या निवडणुकीला अनेकांनी 'डॉक्टर विरुद्ध कंत्राटदार', 'विज्ञान विरुद्ध अज्ञान' आणि 'दृष्टीहीन विरुद्ध दृष्टीदाता' अशी संबोधले आहे. काँग्रेस महाविकास आघाडीचे ऊमेदवार डॉ. शिवाजी काळगे यांनी 'रुग्ण सेवा हीच ईश्वरसेवा' हे ब्रीदवाक्य निवडले आहे, तर त्यांचे प्रतिस्पर्धी कंत्राटदाराचे ब्रीदवाक्य 'निविदा सेवा हीच ईश्वरसेवा' आहे. यामुळे येथील जनतेला न्याय देण्यासाठी राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण सांस्कृतिक कार्यमंत्री व लातूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांना डॉ. काळगे यांना मतदारा पर्यंत नेऊन प्रचंड मताधिक्याने निवडून आणण्यासाठी प्रयत्न करण्याचे आवाहन केले आहे. मंगळवार दि. २ एप्रिल रोजी सकाळी बाभळगाव निवासस्थानी लातूर शहरातील प्रभाग क्रमांक ५, ६, ७, ८, ९ मधील पदाधिकरी, कार्यकर्ते यांची बैठक आयोजित करण्यात आली, यावेळी ते बोलत होते. याप्रसंगी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे सरचिटणीस अमर खानापुरे, माजी महापौर विक्रांत गोजमगुंडे, विलास को–ऑपरेटिव्ह बँकेचे व्हाईस चेअरमन मद पटेल, काँग्रेसचे लातूर शहर विधानसभा मतदारसंघाचे निरीक्षक सर्जेराव मोरे, अभय साळुंखे डॉ. अरविंद भातंबरे, माजी नगरसेवक अशोक गोविंदपूरकर, सचिन बंडापल्ले, युनूस मोमीन सचिन मस्के, ड. फारुक शेख, अहमदखा पठाण, व्यंकटेश पुरी, काँग्रेस पक्षाचे प्रभाग क्रमांक ५ अध्यक्ष खाजामियां शेख, प्रभाग ६ अध्यक्ष गिरीश ब्याळे, प्रभाग ७ अध्यक्ष सुमित खंडागळे आदींसह लातूर शहरातील प्रभाग क्रमांक ५,६,७,८,९ मधील काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते. यावेळी माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख म्हणाले की, काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते हे काँग्रेस पक्षाचे योध्दे आहेत. आपणाला अतिशय गांभीर्याने या लोकसभा निवडणुकीला सामोरे जाऊन ही निवडणूक जिंकायची आहे. महाविकास आघाडीचे उमेदवार डॉ. शिवाजी काळगे यांच्या उमेदवारीचे सामान्य माणसाकडून मोठ्या प्रमाणावर स्वागत होत आहे. भारतीय जनता पार्टीच्या सरकारने गेल्या दहा वर्षात भारताला अभिप्रेत आहे असे कार्य केले नाही. भारतीयांची आर्थिक उन्नती त्यामुळे झाली नाही, सामान्य माणसाला त्यांनी गृहीत धरले आहे, खोके मोजून त्यांनी राज्यात पक्ष फोडला, काही पक्ष फोडले तर त्यांचा मतदार आपणाला मतदान करेल असे त्यांना वाटते ते चुकीचे आहे. राज्यात महायुतीचे तीन पक्षांचे सरकार आहे, सध्या त्यांच्यामध्ये लोकसभेच्या उमेदवारीवरून गोंधळ सुरू आहे. त्यांनी महाराष्ट्राची चेष्टा सुरू केली आहे असे त्यांनी सांगितले. पुढे बोलताना ते म्हणाले की, महाविकास आघाडीचे उमेदवार डॉ. शिवाजी काळगे यांचा वैद्यकीय क्षेत्रातला दांडगा जनसंपर्क आहे. त्यांची जन्मभूमी निलंगा आहे, तर कर्मभूमी ही लातूर आहे. आपल्या जीवनाशी काडीमात्र संबंध नसणाऱ्या विषयावर सध्या भाजप राजकारण करत आहे. केंद्रातील भाजप सरकारने दोन कोटी नोकऱ्या, शेतीमालाला भाव दिला नाही, महागाई गॅस, पेट्रोल, डिझेल दरवाढ मोठ्या प्रमाणात केली आहे. महायुती सरकारने काल परवा घरगुती विजेचे दरही वाढवले आहेत, राज्यात, जिल्ह्यात भ्रष्टाचार मोठ्या प्रमाणात फोफावला आहे. महायुतीच्या विरोधात लोकांमध्ये विरोधाची लाट तयार होत आहे, तर महाविकास आघाडीचे भविष्य उज्वल आहे. त्यामुळे महाविकास आघाडीच्या पदाधिकाऱ्यांना काँग्रेस पदाधिकारी कार्यकर्त्यांनी सोबत घेऊन काम करावे असेही त्यांनी आवर्जून सांगीतले. जानवळ वडवळ भागात रेल्वेचे थांबे बंद पडले आहेत आणि लातूरच्या मराठवाडा रेल्वे कोच फॅक्टरीतून अद्याप कोच बाहेर आले नाहीत. या दोन्ही समस्या लातूर लोकसभा मतदारसंघातील लोकांसाठी महत्त्वाच्या आहेत. महाविकास आघाडीचे उमेदवार डॉक्टर शिवाजी काळगे यांनी निवडणूक जिंकल्यानंतर ते रेल्वे कोच बाहेर काढतील असा विश्वास राज्याचे माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी व्यक्त केला आहे. मतदारांना मतदानाचा हक्क वापरून योग्य उमेदवार निवडण्याचे आवाहन केले जाते. महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे सरचिटणीस अमर खानापुरे म्हणाले की, लातूर लोकसभा निवडणुकीची सर्वात मोठी धुरा, लातूर शहर विधानसभा मतदारसंघावर आहे. माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांच्याकडे सर्व महाराष्ट्र उद्याचे राज्याचे नेतृत्व म्हणून पाहतो, त्यासाठी लातूर लोकसभा आपण जिंकायलाच पाहिजे. काँग्रेस पदाधिकारी कार्यकर्त्यांनी ही निवडणूक जिंकण्यासाठी स्वतःच्या खांद्यावर घेऊन काम करावे. महाविकास आघाडीचे उमेदवार डॉ. शिवाजी काळगे हे विरोधातील उमेदवारापेक्षा अधिक सरस आहेत असे सांगून त्यांनी काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी कार्यकर्ते यांना निवडणुकीतील विजयाच्या संदर्भात सविस्तर मार्गदर्शन केले. या बैठकीचे प्रास्ताविक काँग्रेसचे लातूर शहर विधानसभा मतदारसंघाचे निरीक्षक सर्जे राव मोरे यांनी केले तर माजी महापौर विक्रांत गोजमगुंडे, माजी नगरसेवक अशोक गोविंदपुरकर यांनी मनोगत व्यक्त केले शेवटी आभार व्यंकटेश पुरी यांनी मानले.



## संपादकीय....

# एकजुटीचे दर्शन

विरोधी ऐक्याच्या चिरफळ्या उडत आल्याचे चित्र सातत्याने दिसत होते. परंतु दिल्लीतील सभेच्या निमित्ताने विरोधी ऐक्य टिकून असल्याचे दिसले.केंद्रातील नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकारच्या विरोधात उभारलेल्या विरोधी पक्षांच्या ‘इंडिया’ आघाडीने एकत्रित प्रचाराचे रणशिंग फुंकायचे म्हटले असते, तर त्यात काही नेत्यांचे अहंकार आडवे आले असते आणि अनेकांनी संयुक्त प्रचारसभेला दांडी मारून लक्ष वेधून घेतले असते. विरोधी ऐक्याची देशातील जी परंपरा आहे, त्याला साजेसेच घडले असते.परंतु दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांच्या समर्थनार्थ राजधानी दिल्लीत आयोजित केलेल्या विरोधकांच्या सभेच्या निमित्ताने सगळे विरोधक एकत्र आले आणि विरोधकांच्या ऐक्याची वज्रमूठ देशवासीयांना पाहावयास मिळाली. राहुल गांधी यांच्या ‘भारत जोडो न्याय यात्रे’च्या समारोपाच्या निमित्ताने मुंबईत शिवाजी पार्कवर झालेल्या मेळाव्याच्या निमित्ताने अशा एकजुटीचे प्रदर्शन घडवण्याचा काँग्रेसचा प्रयत्न होता.परंतु तृणमूल काँग्रेससह डाव्या पक्षांनी त्यावर बहिष्कार घातल्यामुळे अपेक्षित एकजुटीचे प्रदर्शन घडणे दूर, उलट विरोधकांमधील मतभेदच प्रकर्षाने समोर आले होते. दिल्लीत रामलीला मैदानावर झालेली सभा त्यादृष्टीने वैशिष्ट्यपूर्ण ठरली. केजरीवाल यांच्या अटकेच्या निषेधार्थ आम आदमी पक्षाच्यावतीने सभेचे आयोजन करण्यात आले होते; परंतु त्याला झारखंडचे मुख्यमंत्री हेमंत सोरेन यांच्या अटकेचीही जोड देण्यात आली आणि एकूणच केंद्रीय यंत्रणांच्या गैरवापराचा विषय जोरकसपणे ऐरणीवर आणला गेला.एवढ्या मोठ्या सभेचे श्रेय एकट्या आम आदमी पक्षाला मिळू नये, असे प्रयत्न झाले असले तरी त्या पक्षाचे आयोजनातील श्रेय नाकारता येत नाही. केजरीवाल यांच्यावर आलेल्या संकटाचे ऋइंडिया’ आघाडीने संधीत रुपांतर करून त्या सभेला विरोधी ऐक्याचा मंच बनवला, हे लोकसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यात विरोधकांचे मोठे यश मानावे लागेल.सोनिया गांधी, मल्लिकार्जुन खर्गे, राहुल गांधी, प्रियांका गांधी अशा काँग्रेसच्या सर्व शीर्षस्थ नेत्यांनी सभेला हजेरी लावून दिल्लीला काँग्रेसच्या अस्तित्वाची ठळकपणे जाणीव करून दिली. त्याचबरोबर ज्या आम आदमी पक्षाने दहा वर्षांपूर्वी काँग्रेसविरोधात प्रचाराची राळ उडवून दिली होती, त्या आम आदमी पक्षासोबत अडचणीच्या काळात उभे राहून भारतीय राजकारणातील उदारमतवादी परंपरेचेही दर्शन घडवले.मोठ्या लढाईत किरकोळ मतभेद उकरून न काढता ते दुर्लक्षित करून पुढे जायचे असते, याचा धडाच यानिमित्ताने बुजुर्ग काँग्रेसने आम आदमी पक्षासह अन्य छोट्या पक्षांच्या उत्साही नेत्यांना दिला. मात्र ही लवचिकता सर्वच पक्षांकडून केवळ सभेपुरती न दिसता प्रत्यक्ष जागावाटपाच्या वाटाघाटीतही दिसली पाहिजे.हे सांगणे आवश्यक आहे, याचे कारण ‘इंडिया’ आघाडी उभारण्यासाठी पाटणा, बंगळूर, मुंबई येथील बैठकांनंतर प्रत्यक्ष निवडणुकीच्या मैदानात फाटाफूटच पाहायला मिळाली. ‘इंडिया’ आघाडीचे पुरस्कर्ते नितीश कुमारच ‘एनडीए’च्या गोटात गेले. आजोबांच्या ‘भारतरत्न’च्या ओझ्याखाली राष्ट्रीय लोकदलाच्या जयंत चौधरी यांनीही एनडीएचा रस्ता धरला. पश्चिम बंगालमध्ये ममता बॅनर्जी यांनी काँग्रेसला बेदखल करून आपले उमेदवार जाहीर केले.केरळमध्ये काँग्रेस आणि डावे आमने–सामने आहेत, तर पंजाबमध्येही काँग्रेस आणि आम आदमी पक्षातच लढत होत आहे. विरोधी ऐक्याच्या चिरफळ्या उडत आल्याचे आजवरचे भारतीय राजकारणातील चित्र होते, परंतु दिल्लीतील सभेच्या निमित्ताने वेगळे चित्र समोर आले. विरोधी ऐक्य टिकून असल्याचे दिसून आले.ममता बॅनर्जी ‘इंडिया’ आघाडीचे नावच घेत नव्हत्या, त्यांच्या प्रतिनिधी नवनियुक्त खासदार सागरिका घोष यांनी ‘तृणमूल’ इंडिया आघाडीतच असल्याची घोषणा करून आघाडीला मोठा दिलासा दिला. राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार व शिवसेना (उद्धव ठाकरे) पक्षाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांना मिळालेला प्रतिसाद महाराष्ट्राचे ‘इंडिया’ आघाडीतील अस्तित्व ठळक बनवणारा होता.व्यासपीठावर अनेक पक्षांचे बडे नेते असले तरी सर्वात मोठे नेते राहुल गांधी असल्याचे जाणवत आहे. दोन यात्रांच्या माध्यमातून कमावलेला आत्मविश्वास त्याच्या भाषणांतून जाणवतो आहे. परिवर्तनाचा प्रारंभबिंदू ठरणारे केंद्र म्हणून दिल्लीचे ‘रामलीला मैदान’ ओळखले जाते. तिथून फुंकलेले रणशिंग विरोधकांचा आत्मविश्वास उंचावणारे ठरू शकेल.अर्थात दिल्लीतून परत गेल्यावर पश्चिम बंगालमध्ये काँग्रेस– तृणमूल काँग्रेस यांच्यात कलगीतुरा रंगेल, तृणमूल काँग्रेस–डावे यांच्यात संघर्ष सुरू होईल. केरळमध्ये काँग्रेस आणि डाव्यांमध्ये सुरू असलेली लढाई अधिक अटीतटीची बनेल आणि पंजाबमध्येही तीव्र चुरस पाहायला मिळेल. असे सगळे विरोधाभास असले तरी वर्तमान राजकारणाची गरज म्हणून आघाडीअंतर्गत हा संघर्ष मान्य करण्यात आला आहे. त्यापलीकडे जाऊन ऐक्याचा संदेश देणे गरजेचे होते, तो या सभेत दिला गेला, हे मात्र नक्की.

# आंबेडकरांच्या वाटेतील रातकिड्यांनो....

लोकसभेची निडणूक आली आहे .सर्व पक्षांचे कार्यकर्ते अगदी तन, मन आणि जमलं तर धनाने कामाला लागले आहेत. ज्यांच्या खात्यात पंधरा लाख जमा झाले नाही ते ही गप गुमान दऱ्या अंथरण्यात, उचलण्यात व्यस्त झाले आहेत. त्यांना कधीही पंधरा लाख मिळाले नाही हे दुःख झालं नाही. देशाचं राजकारणात कोणत्या दिशेला चाललं आणि त्याला जबाबदार कोण? हा प्रश्न मात्र न चुकता तथाकथित आंबेडकर वाद्यांना पडतो. मग हे रातकिडे प्रकाशाच्या अंधार वाटेत नेमका निवडणुकीचा हंगाम बघून आपला सामूहिक किरकिराट करतात. नेहमीप्रमाणे रातकिडे कामाला लागले आहेत. प्रकाशाच्या अंधार वाटेत अशा रात किड्यांचा खूप खूप स्वागत आहे. प्रकाश आंबेडकरांवर कधी घराणेशाहीचा आरोप ठेवला गेला ,कधी हट्टीपणाचा आरोप केला गेला. त्यांच्या सोशल इंजिनिअरिंगची मजा उडविण्यात काही रातकिडे स्वतःला धन्य मानतात . आता तर प्रकाश आंबेडकरांच्या भूमिकेविषयी अनेक अफवांचे पीक येऊन गेले .असे अफवांचे पीक प्रत्येक निवडणुकीत आले. आणि हे रातकिडे पुढे असे पीक काढत राहतील. काँग्रेस राष्ट्रवादी काँग्रेस आणि उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेना युतीत आंबेडकरांनी सहभाग नाकारला ,अशी चर्चा सोशल मीडिया आणि प्रिंट मीडिया तसेच इलेक्ट्रॉनिक मीडियाने दिली. काहीसा हाच धागा पक्का करत रातकिड्यांनीही आपला सूर मिसळला. कथित युती तोडल्याचा आरोप प्रकाश आंबेडकरांवर करण्यात आला. आणि त्यांनी आपली भूमिका स्पष्ट केली युतीचा किंवा मैत्रीचा धर्म पाळणाऱ्यांनी समविचारी मित्र म्हणून आपल्या निर्णय प्रक्रियेत आंबेडकरांना बोलवायला हवे होते. पण आम्ही इतक्या जागा दिल्या आणि आंबेडकरांनी नाकारल्या अशी अफवा याच मित्रांनी पसरविली पण हे हवेवरचे आरोप असून ऑफिशिअली मला निर्णय प्रक्रियेतून डावल्याचा आरोप प्रकाश आंबेडकरांनी केला. एकीकडे मित्र म्हणायचं आणि मित्राला सोडून तीन मित्रांनी पार्टी साजरी करायची ही कसली मैत्री ? प्रकाश आंबेडकर सजग नेते आहेत . युती सन्मानपूर्वक व्हायला हवी लोकसंख्येच्या प्रमाणात प्रतिनिधित्व मिळावं .आणि सन्मानाची वागणूक मिळावी अशी त्यांची रास्त अपेक्षा आहे मागील निवडणुकीत वंचित ने घेतलेल्या मतामुळे काँग्रेसच्या अनेक जागांवर उमेदवारांना पराभूत व्हावे लागले ,असे एकतर्फी गणित मांडून काँग्रेस आणि रातकिड्यांनी प्रकाश आंबेडकरांना आंबेडकरी जनतेत बदनाम करण्याचा प्रयत्न केला. पण हे गणित वंचितच्या बाजूने मांडायचे झाल्यास काँग्रेसच्या अडेलतट्टू भूमिकेमुळे वंचितला अनेक ठिकाणी पराभूत व्हावे लागले असेही मांडता येईल. असेही म्हणता येईल. आपल्या जय पराजयासाठी आंबेडकरी समाजाला कारणीभूत समजणाऱ्यांनी वंचितच्या काही पराभूत जागांसाठी काँग्रेसची अडेलतट्टू भूमिका कारणीभूत आहे हे मान्य करावे लागेल. कारण आंबेडकरी समाज तुमच्या बापजाद्यांची मालमत्ता नाही. आंबेडकरी नेत्यांना एकतर्फे आरोपींच्या पिंजऱ्यात उभे करणे केवल काँग्रेस आणि संचांचा बालिशपणा आहे. निर्णय प्रक्रियेत मित्र असलाच पाहिजे. त्या प्रक्रियेतून डावलण्यात येत असेल तर मैत्रीच्या सन्मानजनक मर्यादांची पायमल्ली कोणी केली? आपल्या सोयीच्या राजकारणासाठी आंबेडकरी समाजाला हुजऱ्या समजण्याची प्रथा आता बंद करा . तिकडे आम्हाला दोन जागा द्या किंवा त्या बदल्यात केंद्रात आणि राज्यात पुनर्वसन करा म्हणणारा नेता, आठवले आणि भाजपाच्या प्रचारात नाचणारा प्राध्यापक जोगेंद्र कवाडे सत्तेसाठी किती लाचार झालेत याचे उदाहरण आपल्या सर्वांपुढे आहे. लाथ मारतो प्राध्यापक जोगेंद्र कवाडे त्या खुर्चीला त्यांच्या भाषणातील हे गाजलेलं वाक्य आहे ते मला अजूनही आठवतं. आणि माणूस सत्तेसाठी इतका कधी लाचार होऊ शकतो यावर चटकन विश्वास बसत नाही. पण लाचारांची फौज बघतोच आहोत . निवडणुकिचा आणि भोतमांगे हत्याकांडाचा सुतराम सबंध असेल असे मला वाटत नाही. पण दात पडलेले पँथर्स आपल्या अनेक लेखात भोतमांगे हत्याकांडाची आठवण करून देतात . राजकारणाची हवा भलत्याच दिशेला वाहून नेण्याची गरज का वाटते आहे? हे कळायला मार्ग नाही . बाबासाहेबांनी काँग्रेसला जळते घर म्हटले होते . त्याऊपर त्यांनी काँग्रेस ही पिळवणूक करणाऱ्यांची आणि पिळले जाणाऱ्यांची झालेली एकजूट आहे असे म्हटले होते. पण आज अनेक रिपब्लिकन नेते काँग्रेसच्या वळचणीखाली उभे आहेत. शिवसेना आणि भाजप चुलत भाऊ मावस भाऊ अशा नात्यात वावरतांना दिसले. आणि आता सख्खे भाऊ झाले. कट्टर हिंदुत्वाचे ढोल पिटणारे उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेना नेते मावाळ(?) हिंदुत्ववादी असणाऱ्या काँग्रेसला नेहमी शत्रू म्हणून बघत आले. ते आता राष्ट्रवादी काँग्रेस, काँग्रेसचे मित्र झाले. अजित पवारांना भाजपकडे कधीही थारा नाही असे म्हणणारे फडणवीस अजित पवारांचे यार झाले. घरात नाही पीठ कशाला हवे विद्यापीठ असे म्हणणाऱ्यांनी प्रकाश आंबेडकरांकडे मैत्रीचा प्रस्ताव ठेवला. आणि आपलं स्वतंत्र अस्तित्व राखण्यासाठी धडपटणाऱ्या इतर नेत्यांप्रमाणे प्रकाश आंबेडकरांनीही प्रयत्न केला. तेव्हा मनोज जरांगेच्या सोबत झालेल्या आंबेडकरांच्या चर्चेला प्रकाशाच्या अंधार वाटेत किरकीराट करणाऱ्या रातकिड्यांनी भोतमांगे हत्याकांडांची आठवण देऊन राजकारणात जातीचा रंग भरून दोन समाजात तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न केला. काँग्रेस ,सेनेने दिलेल्या सर्व जखमा भरून निघाल्या नाहीत तरी मैत्री सुरूच आहे. एवढेच नाही तर लाचारीने त्यांच्या मागेपुढे मिरवणारे ही अनेक लाचार रिपब्लिकन नेते आहेत हे सर्व माफ .मग प्रकाश आंबेडकरांनी शोधलेल्या पर्यायाला विरोध करण्याचे कारण काय ? राजकारणात अनेकांनी नवीन प्रयोग केलेले आहेत. पुलोद ही संकल्पना नव्या प्रयोगाची नव्हती काय? शिवसेनेतून बाहेर पडून आपले नवे अस्तित्व मांडणाऱ्यांनी नवा प्रयोग केला नाही काय? राजकारणात अशा नव्या प्रयोगांची फार मोठी मालिका आपल्याला बघायला मिळेल. मग प्रकाश आंबेडकर वेगळं राजकारण करतायत तर काही भाडखाउंना ते प्रयोग का सलतात ?आज प्रकाश आंबेडकरांकडे समाजाची अपेक्षा वाढली आहे .तसेच ओबीसींची, बहुजन समाजाची माणसं जोडली गेली आहेत. प्रकाश शेडगे सारखे ओबीसी नेते आंबेडकरांशी चर्चा करतात आहे, हे प्रकाश आंबेडकरांचं संघटन कौशल्य आहे. राजकारणातील मुत्सद्दगिरी आहे. युतीचा धर्म पाळण्याचा ठेका फक्त आंबेडकरांचाच नाही .त्या युती धर्माचं पालन करण्याची जबाबदारी युतीतील इतर पक्षांची ही आहे. येणाऱ्या निवडणुकीत ही युती फिसकटली आणि काँग्रेसचे काही उमेदवार पडले तर त्याचं खापर आंबेडकरांवर फोडायला कोणी धजाऊ नये. युतीतील अंतर्गत कलहामुळे वंचित चे उमेदवार पडलेत असे म्हणायला आम्हीही मोकळे आहोत .वंचित बहुजन आघाडी दखल घेण्याइतपत मोठी झालीय. त्यामुळेच दात नसलेले बोबडे आणि नखं कापले गेलेले पँथर प्रकाशाच्या अंधार वाटेवर चाचपडताना दिसतात .भूतकालीन निवडणुकीत प्रकाश आंबेडकरांना भाजपाची बी टीम म्हणणारे अजित पवार हे स्वतःच भाजपवासी झालेत. त्यामुळे त्यांच्या उरल्यासुरल्या चेल्या चपाट्यांयांनी प्रकाश आंबेडकरांना भाजपची बी टीम म्हणण्याचं धाडस करू नये. ज्या शेंबड्यांना राजकीय विश्लेषण करता येत नाही ते गोपीचंद पडळकर मते खाऊन गेला म्हणतात. खरेतर गोपीनाथ पडळकर वंचितला मते देऊन गेले. वंचित चा भाव वाढवून गेले. वंचितकडे तिकीट मागून त्यांनी वंचित हा सबळ पक्ष आहे हे मान्य केले होते. तसे नसते तर पडळकर अन्य रिपब्लिकन गटाकडे तिकीट मागत फिरले असते. साकोली विधानसभेत सेवक वाघाये या काँग्रेसच्या माजी आमदाराने तिकीट घेऊन वंचित साठी निवडणूक लढली. अगदी काही दिवसांपूर्वीच प्रकाश आंबेडकर यांची भंडारा जिल्ह्यातील साकोली येथे फार मोठी सभा झाली. आणि सेवक वाघाये परत लोकसभेची तिकीट मागायला गेले. प्रकाश आंबेडकरांनी तिकीट नाकारलं. हे प्रकाश आंबेडकर यांच्या पक्षाचे वाढतं वर्चस्व आहे. विधानसभा निवडणुकीत सेवक वाघाये परत काँग्रेसवासी झाले म्हणून ते वंचित वर थुंकून गेले गोपीचंद पडळकर भाजपवासी झाले म्हणून ते वंचित वर थुंकून गेले असे पोरकट विश्लेषण मांडणाऱ्यांची किव येते. राजकारणात इकडून तिकडे उड्या मारणाऱ्यांची संख्या कमी नाही. शिंदेंबरोबर गेलेले आमदार आज त्यांच्या सोबत नाहीत .अमरावतीत बच्चू कडूंनी घूमजाव केला. अनेकांनी आमदारकीचा राजीनामा दिला. निलेश श्रीलंकेचा राजीनामा सगळ्यांना ठाऊक आहे. लंकेनी राजीनामा देऊन दंड थोपटले. ही प्रातिनिधीक उदाहरणं झाली. असे पक्ष बदलणारे अनेक नेते आपण रोज पाहतो. मग पडळकर यांच्या जाण्याचे दुःख वंचित ने का बाळगावे? आणि दात नसलेल्या पँथरसने पडळकर गेले अशी हाकाटी का करावी ? तसाही पडळकर यांचा आणि त्यांचा काय संबंध? पडळकर पचकाभर थुंकून गेले नाही ते वंचितचं वजन वाढवून गेलेत, हे हातबल पँथर्स ला कोणी सांगावं? राजकारणात कुणीच कुणाचा होत नाही? काकांनी वाढवलेले पुतणे काकांना सोडून गेलेत .ही महाराष्ट्रातील उदाहरणे काही शेंबडे कसे विसरतात? राजकारणात कोणी कोणाचा मित्र नाही आणि कोणी कुणाचा कायम शत्रू नाही .जिथे घरातील भाऊबंदकी संपते तिथे वंचितला पडळकर यांची काय पर्वा ? वंचित कडे पडळकरांसारखे आणखीही अनेक लोक आलेत त्यांची पण बेरीज झाली पाहिजे. दात नसलेल्या पँथरसने त्याची पण बेरीज करावी .आंबेडकरी समाजात नेत्यांची कमी नाही .आंबेडकरी विचारधारा सांगणारे सर्व नेते आणि त्यांचे पक्ष असले तरी सर्वावर टीकांचा वर्षाव होतच नाही. निवडणूक आली की मायावती आणि प्रकाश आंबेडकर यांच्यावरच अधिक टीकांचा वर्षाव होतो. हे आजपर्यंत कुणाच्याही लक्षात यावं इतकं स्पष्ट आहे. याचा अर्थ असा, दात पडलेले पँथर्स ,अंधारात चाचडणारे रातकिडे हे सुपारी बाज दलाल आणि भाडखाउ असल्यामुळे ते आपल्या लेखणीतून विरोधी विचार मांडत असतात. कारण आंबेडकरी विचारधारा किंवा आंबेडकरवाद सत्तेपर्यंत पोहचू नये ही योजना येथील प्रस्थापित समाज व्यवस्थेने आखून घेतली आहे. त्यामुळे असे हस्तक आपल्या लेखणीतून विरोधी विचार पेरत असतात. यांना एकच प्रश्न विचारा. प्रकाशाच्या अंधार वाटेवर प्रवास करणाऱ्या रातकिड्यांनो तुमचा पक्ष कोणता? एवढं फक्त सांगा .मला माहित आहे ते कधीही सांगू शकणार नाही. तेव्हा त्यांना ठणकावून सांगा, आंबेडकरांच्या वाटेतील रातकिड्यांनो खबरदार.



********

**राजू बोरकर**
**मु. पो. ता. लाखांदूर**
**जि. भंडारा**
**७५०७०२५४६७**

# मोबाईल – वरदान की श्राप?

हल्ली रस्त्यावरून प्रवास करताना एक बाब सातत्याने खटकते ती म्हणजे गाडी चालवताना नाहक मोबाईलचा होत असलेला वापर.आपण पाहतो छोट्यांपासून मोठ्यापर्यंत अनेकजण सर्रासपणे आलेले संदेश वाचत गाडी चालवणे,आलेला कॉल उचलून बोलत गाडी चालवणे,थोड्या थोड्या वेळाने उगीच मोबाईल काढून पाहणे हे नेहमीचे झाले आहे.सरकार कडून ठिकठिकाणी रस्त्यावर सुरक्षिततेबाबत पाट्या लावलेल्या असतात परंतु याकडे दुर्लक्ष करून अनेकजण गैरजबाबदारीने वाहन चालवताना दिसतात.सध्याच्या परिस्थितीत अपघातात होत असलेली प्रचंड वाढ यात मोबाईल हे सुद्धा मुख्य कारण असणे नाकारता येत नाही.

जीवन हे अनमोल आहे मग त्याचे महत्त्व आपणाला कळतं नाहीये का असा प्रश्न काही दृश्ये पाहताना पडतो.किती महत्वाचा कॉल अथवा मेसेज असला तरी तो जिवापेक्षा जास्त किमती आहे का? जर एखाद्या व्यक्तीचा आलेला फोन आपण टाळला आणि कुठेतरी सुरक्षित ठिकाणी थांबून मग त्याच्याशी बोललो तर जो पाच दहा मिनिट उशीर झालेला असेल त्यात खूप मोठे नुकसान होते असे नाही एव्हाना जास्त तर येणारे कॉल्स हे किरकोळ गोष्टीसाठी असतात.तरुण मुलांच्या बाबतीत तर केवळ मित्रांच्या व्हॉट्सप आणि फेसबुक पोस्ट वाचण्यासाठी गाडी चालवत वेळ देत असतात.

मी एके ठिकाणी पाहिलेला किरकोळ अपघात ज्यात कानाला मोबाईल लाऊन आणि तिरकी मान करून फोनवर बोलत मोटरसायकल चालवणारा तरुण छोट्या रस्त्यावरून मुख्य रस्त्यावर येत असताना अचानक समोरून आलेले वाहन पाहून मोटरसायकल नियंत्रित न झाल्याने वळण्याऐवजी सरळ समोर जाऊन मोठ्या नाल्यात मोटरसायकल सहित पडला बरं एवढ्यावर तो थांबला असता तर ठीक परंतु त्यानंतर सुद्धा मोटरसायकल तशीच सोडून तो उठला आणि कपडे झटकत परत फोनवर बोलत उभा राहिला.सुदैवाने जास्त दुखापत झाली नव्हती परंतु विचार करण्यास भाग पाडणारे ते एकंदरीत दृश्य होते.

जीवाची पर्वा न करता असले कृत्य नेमके कशासाठी करतो हा विचार करायला हवा.मोबाईल हा आजच्या आधुनिक युगासाठी खूप महत्वाचा दुवा बनला आहे.जसे त्याचे फायदे तसेच त्याचे नुकसानही आहे.मोबाईलमुळे जीवन जगणे जरी सोपे झाले असले तरी फायद्यापेक्षा जास्त त्याचे नुकसान पाहायला मिळते.नवीन नवीन अपडेट्स असलेले मोबाईल घेऊन तासनतास त्यावर वेळ घालवणारे अनेकजण पाहायला मिळतात.मोबाईलचा सदुपयोग म्हणजे त्याद्वारे जीवनात सहजता यावी आणि अत्यंत तातडीच्या वेळी मोबाईलमुळे मदत घेता यावी परंतु असे घडताना दिसत नाही.ऑनलाईन गेम आणि सोशियल प वरून मैत्री होते आणि त्या फसव्या मैत्रीतून पुढे निराशा वाढून जीवन संपवलेले काही उदाहरण आहेत तर मोबाईलचा गैरवापर करून फसवणुक झाल्याचे पण बरेचसे उदाहरण आपण पाहिलेले किंवा एकेलेले असतील.इमेल आणि मेसेज बॉक्स मध्ये आलेल्या अनेक प्रकारच्या वेबलिंकसवर क्लिक करताच त्याद्वारे मोबाईल हॅक केला जातो आणि मग आपल्या नकळत आपल्या बँक खात्यामधून पैसे जातात आणि आपली फसवणूक होते.आपल्या दैनंदिन जीवनात सकाळच्या चहा पासून तर रात्री झोपण्यापूर्वी पर्यंत प्रत्येक गोष्टीचे अपडेट्स शेअर करण्याची काही जणांना सवय असते आणि हे शेअर करताना आपण हे विसरून जातो की याचा गैरवापर करून जाळ्यात अडकवणारे अनेक हॅकर्स किंवा तऱ्हाईत गुन्हेगार अश्या पोस्टची वाट पाहून असतात.

कोणतेही प इंस्टॉल करताना फोन गॅलरी,कॉल लॉग,मीडिया कंटेंट ,मेसेज बॉक्स ,कॅमेरा या सर्वांचा क्सेस घेण्यासाठी अलाऊ आणि डेनाई असे ऑप्शन्स विचारले जातात आणि आपण स्वतः आपल्या संपूर्ण फोनचा क्सेस त्या पला देऊन टाकतो.आपण कधी विचार केला का आपण जे काही गूगलवर शोधत असतो त्या वस्तूंच्या बाबतीत फोनवर जाहिरात,कॉल्स आणि मेसेज येत राहतात.आपण दिलेल्या क्सेसमुळे गुन्हेगार आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करत सोशल साईट अथवा प मधील फोटोवरचे चेहरे वापरून अश्लील फोटो आणि व्हिडिओज बनवले जातात व ते व्हायरल करण्याची धमकी देऊन खंडणीची मागणी केली जाते.सिम कार्ड ब्लॉक झाले, विज बिल बाकी आहे,–ढच् ब्लॉक झाले आहे,बँक खाते बंद झाले आहे , कुरिअर आले आहे असे अनेक कारणे देऊन जढ्ढ मागितले जाते आणि अनेकजण सहजरित्या सर्व विचारलेली माहिती देऊन मोकळे होतात आणि जेंव्हा खात्यातून पैसे वजा होतात तेंव्हा पश्चाताप करत बसतात.

महिलांनी प्रामुख्याने सोशल साईट वापरताना काळजी घ्यावी ,अनोळखी व्यक्ती किंवा समूह यांच्याकडून आलेली फ्रेंड रिक्वेस्ट टाळावी किंवा त्या व्यक्ती अथवा समूहाची योग्य शहानिशा करून मगच स्वीकारावी म्हणजे नंतर पश्चात्ताप करण्यापेक्षा अगोदर काळजी घेतलेली बरी.एकंदरीत फसवणूकीचे अनेक प्रकार घडत असताना आरोग्यासाठी सुद्धा मोबाईल हानिकारक ठरत आहे. मोबाईलचा अतिवापर केल्याने लहान मुलांमध्ये नजरदोष आणि मेंदुविकार असले आजार होताना पहावयास मिळतात.महिलावर्ग कामात अडथळा करू नये म्हणून लहान मुलांना मोबाईल वर व्हिडिओ लावून देतात आणि तासनतास काम करत राहतात.अभ्यासाच्या नावाखाली मोबाईल घेऊन त्यावर नको ते पाहताना पण अनेक पालकांनी मुलांना पकडले असेल.पालकांनी मुलांना मोबाईल दिल्यानंतर दुर्लक्ष करण्याऐवजी तिसरा डोळा कायम राखून ठेवला तरच काही प्रमाणात गैरवापर होण्यापासून थांबवता येईल.

उपरोक्त उल्लेख केलेल्या बाबी प्रामुख्याने नेहमीच पाहायला मिळतात आणि काही बाबी यापेक्षा अधिक जास्त त्रासदायक असतात.मोबाईलचा वापर कसा आणि किती करायचा हा वयक्तिक प्रश्न आहे यावर मर्यादा लावणे हा सुद्धा आपल्या परीने ठरवण्याचा भाग आहे. मोबाईलवर झउऋस्वरूपात पुस्तके उपलब्ध असतात,अनेक प्रकारची महत्वाची माहिती गोळा करता येते,साहित्य वाचन करता येते,मुलांसाठी अनेक प्रकारचे कार्टून स्वरूपात छान छान गोष्टी, बोधकथा पण सहज उपलब्ध होतात आणि याद्वारे मुलांना योग्य संस्कार देण्याचे काम पण करता येते.मोबाईल हा सदुपयोगी येणारा घटक म्हणून पाहण्याची गरज आहे.आपल्याला आलेला संदेश,व्हिडिओ,कुणाचे वक्तव्य ,एखाद्या घटनेचा वृतांत हे सर्व आपल्या ठिकाणी एकवेळ पडताळून मगच पुढे पाठवण्याची सवय लागली तर समाजात निर्माण होणारी तेढ कमी करणे सहज शक्य होईल.

*************

**पवन श्रीरंगसा कुसुंदल,नांदेड**
**मोब. ९०७५५९५६९५**

# धीरेंद्र शास्त्रींनी आक्षेपार्ह वक्तव्य देणे बंद करावे व जिभेवर आवर घालावा.

धीरेंद्र शास्त्री यांचे भंडारा जिल्ह्यातील मोहाडी येथे २७ मार्चपासुन प्रवचनाला सुरूवात झाली आणि २९ मार्च शुक्रवारला आपल्या प्रवचनात एक सेवक धर्माबाबत आक्षेपार्ह विधान केले.तेव्हापासुनच सेवकांमध्ये आक्रोश निर्माण झाला. प्रवचन दरम्यान धीरेंद्र शास्त्रींनी सलग दोन दिवस मानवधर्माचे संस्थापक बाबा जुमदेवजी आणि परमात्मा एक सेवक धर्माबाबत आक्षेपार्ह विधान केल्याने हजारो सेवक संतप्त झाले.धीरेंद्र शास्त्रीने या आधी संत साईबाबा,संत तुकाराम महाराज व भगवान सहस्त्रार्जुन महाराज अशा अनेक संतांबद्दल व देवतांबद्दल आक्षेपार्ह विधान केलेले आहे.ही अत्यंत घृणास्पद आणि निंदनीय बाब आहे याचा सर्वच स्तरातून निषेध सुद्धा करण्यात आला होता.धीरेंद्र शास्त्री स्वतःला महाराज समजतात;परंतु त्यांच्यात तसा कोणताही गुण दिसत नाही फक्त कटुता निर्माण करण्याचे काम करतात व स्वत:ला प्रसिद्धी मिळावी या उद्देशाने त्यांचे प्रवचन असते हे त्यांच्या आक्षेपार्ह वक्तव्यावरून दिसून येते.देशातील कोणताही व्यक्ती असो प्रत्येक व्यक्ती आपापल्या पद्धतीने देवीदेवतांची व साधुसंतांची पुजा अर्चना करीत असतो आणि हा त्यांचा अधिकार आहे.त्यात बागेश्वर बाबा सारखे महाराज जहर घोळण्याचे कार्य करीत असेल तर हिंदू धर्म कदापि सहन करणार नाही.हिंदु धर्मात ३३ कोटी देवीदेवता व साधु-संत आहेत त्यामुळे कोणाला कोणी मानावे हे धीरेंद्र शास्त्रींनी शिकवु नये.देशात १४० कोटी जनता आहे.प्रत्येक व्यक्ती आपापल्या पद्धतीने देवी देवतांना मानतो.त्यामुळे समाजामध्ये दुरावा निर्माण करण्याचे काम धिरेंद्र शास्त्रींनी ताबडतोब बंद केले पाहिजे.धीरेंद्र शास्त्रीने कुठेतरी प्रवचन करायचे आणि आक्षेपार्ह वक्तव्य करायचे हा त्यांनी जनुकाय धंदा मांडल्याचे दिसून येते.कारण एका चुकीच्या शब्दांमुळे हजारो सेवकांच्या व भक्तांच्या मनावर विपरीत परिणाम होतो ह्या गोष्टीची जाणीव बागेश्वर बाबांनी लक्षात ठेवली पाहिजे.कारण आक्षेपार्ह विधानामुळे परमात्मा एक च्या सेवकांमध्ये तीव्र संतापाची लाट पसरली याचे पडसाद, नागपूर, भंडारा, मोहाडी सह महाराष्ट्रातील अनेक भागात दिसून आले.यानंतर धीरेंद्र शास्त्रींने सारवासारव करत चुकीच्या विधानाबद्दल सेवकांना माफी मागितली.यावरून स्पष्ट होते की आक्षेपार्ह विधान करायचे व नंतर माफी मागायची व मिडीयाच्या माध्यमातून स्वतःची प्रसिद्ध करून घ्यायची हे त्यांच्या प्रवचनावरून दीसुन येते.धीरेंद्र शास्त्रीने लक्षात ठेवले पाहिजे की महाराष्ट्र ही संतांची भूमी आहे त्यामुळे या भुमित साधुसंत किंवा देवीदेवतांचा अपमान कदापि सहन केला जाणार नाही याची जाण धीरेंद्र शास्त्रीने ठेवली पाहिजे.धीरेंद्र शास्त्रीजी स्वतःच्या स्वार्थासाठी हिंदू धर्मात फुट पाडण्याचा कदापि प्रयत्न करू नका.दिनांक १२ मे २०२३ रोजी धीरेंद्र शास्त्री यांनी क्षत्रिय समाजाचे आराध्य दैवत भगवान सहस्त्रार्जुन महाराजांबद्दल आपत्तीजनक टिप्पणी केली होती.त्यामुळे समाज बांधवांच्या भावना दुखावल्या गेल्या व आक्रोश निर्माण झाला होता.याचे पडसाद संपूर्ण भारतात पसरले होते.यानंतर धीरेंद्र शास्त्रीने जाहिर माफी मागितली. दिनांक २९ एप्रिल २०२३ ला दैनिक लोकमत वर्तमानपत्रात प्रसिद्ध झालेल्या सुप्रीम कोर्टाच्या आदेशात म्हटले आहे की, विव्देषक वक्तव्य करणारे कोणत्या धर्माचे आहे याचा विचार न करता त्यांच्या विरोधात राज्यांनी स्वतः गुन्हे दाखल करावेत.असा आदेश दिनांक २८ एप्रिल २०२३ रोज शुक्रवारला सुप्रीम कोर्टाने दिला होता. त्यात त्यांनी हेही म्हटले आहे की कोणीतरी तक्रार करेल याची वाट न पाहता राज्यांनी कारवाई ताबडतोब करावी. याच आधारावर सरकारने सुप्रीम कोर्टाच्या आदेशाचे पालन करून धीरेंद्र शास्त्रींवर सरकारने गुन्हा दाखल करावा.कारण वारंवार कोणाच्या धर्माबद्दल किंवा देवीदेवतांबद्दल किंवा साधुसंतांबद्दल आक्षेपार्ह विधान करून सर्वसामान्यांच्या भावनांशी खेळ खेळत आहे.त्यामुळे धीरेंद्र शास्त्रीवर कायदेशीर कारवाई व्हायला हवी.

**********

लेखक<br>
रमेश कृष्णराव लांजेवार.<br>
( माजि विद्यापीठ प्रतिनिधी नागपूर )<br>
मो.नं.९९२१६९०७७९,<br>
नागपूर.

## येणाऱ्या लोकसभा निवडणुकीमध्ये वंचित बहुजन आघाडीला साथ द्या.. परमेश्वर रणसूर यांचे आव्हान.

मुंबई/शहामत शेख :- मुंबई जिल्ह्यातील सर्व जनतेला आव्हान करण्यात येत आहे की येणारी २०२४ची निवडणूकीत भिमाच्या रक्ताला साथ द्या. निष्कलंक, एकनिष्ठ, निडर, स्वाभिमानी नेता आद. श्रद्धेय ॲड बाळासाहेब तथा प्रकाश आंबेडकर साहेबांना साथ द्या! वंचित बहुजन आघाडीला द्या. कुठल्याही अप्रचाराला व आमिषाला बळी न पडता आपले अमूल्य मते वंचित बहुजन आघाडी लाच द्या. असे आव्हान वंचित बहुजन युवा आघाडी मुंबई अध्यक्ष परमेश्वर रणसूर यांनी केले.




## कोल्हापूर जिल्ह्यात २७० पथकांची नजर

कोल्हापूर : प्रतिनिधी कोल्हापूर जिल्ह्यात लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ च्या दरम्यान उमेदवार आणि राजकीय पक्षांच्या निवडणूक खर्चावर आणि निवडणुकीतील गैरप्रकारांवर लक्ष ठेवण्यासाठी जिल्ह्यात प्रत्येक मतदारसंघात ८५ भरारी पथके आणि ११९ स्थिर सर्वेक्षण अशा एकूण २७० पथकांची स्थापना करण्यात आली आहे.खर्च संनियंत्रणासाठी जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी यांच्या अधिनस्थ जिल्हास्तरावर समन्वय अधिकारी नेमलेले आहेत. प्रत्येक मतदारसंघाचे निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या स्तरावर खर्च पथक नेमलेले आहे. या पथकाचे काम अन्य विविध पथकांच्या समन्वयाने चालते. व्हीडीओ सर्वेक्षण पथकांची संख्या ४५ असून, २१ व्हीडीओ पाहणी पथके कार्यरत आहेत. विविध प्रक्रियांचे चित्रीकरण जिल्ह्यातील दोन लोकसभा मतदारसंघाअंतर्गत १० विधानसभा मतदारसंघांत मिळून निवडणूक कालावधीत भरारी पथक (एफएसटी), स्थिर सर्वेक्षण पथक (एसएसटी), व्हीडीओ सर्वेक्षण पथक (व्हीएसटी), व्हीडीओ पाहणी पथक (व्हीडीओ), माध्यम संनियंत्रण आणि प्रमाणीकरण समिती (एमसीएमसी), जिल्हा नियंत्रण कक्ष व तक्रार संनियंत्रण कक्ष हेदेखील खर्च पथकाला सहकार्य करतात. तसेच त्यासाठी आयकर विभाग आणि राज्य उत्पादन शुल्क विभागाची देखील या कामात मदत घेतली जाते.




# स्थानिक गुन्हे शाखेची कामगिरी, ४ मोटरसायकल जप्त. ०१ आरोपी अटक

लातूर :- स्थानिक गुन्हे शाखेची कामगिरी, ४ मोटरसायकल जप्त. ०१ आरोपी अटक* या बाबत थोडक्यात हकीकत अशी की,पोलीस अधीक्षक श्री.सोमय मुंडे यांचे आदेशान्वये अपर पोलीस अधीक्षक डॉ.अजय देवरे यांनी जिल्ह्यातील विविध पोलीस स्टेशनला घडलेले मालाविषयक गुन्हे उघडकीस आणण्याकरिता पोलीस अधिकारी व अंमलदार यांना सूचना व मार्गदर्शन करण्यात आले होते.

पोलीस स्टेशनला दाखल असलेल्या विशेषतः मोटारसायकल चोरीचे गुन्हे उघडकीस आणण्याकरिता विशेष पथके स्थापन करून गुन्हे उघड करण्याचे प्रयत्न सुरू होते .

त्या अनुषंगाने पोलीस निरीक्षक स्थानिक गुन्हे शाखा चे पोलीस निरीक्षक संजीवन मिरकले यांचे नेतृत्वात सदर पथके माहितीचे संकलन करीत असताना, माहिती घेत असताना दिनांक ०१/०४/२०२४ रोजी पथकाला माहिती मिळाली की, चाकूर तालुक्यातील मौजे घारोळा येथील मोटारसायकल चोरीच्या गुन्ह्यातील गुन्हेगार त्याने चोरलेल्या मोटरसायकली घरासमोर लावून त्या मोटरसायकली विकण्याचा प्रयत्न करीत आहे.अशी खात्रीशीर बातमी मिळाल्याने दिनांक ०१/०४/२०२४ रोजी सदर पथक मौजे घारोळा तालुका चाकूर जिल्हा लातूर येथे पोचून एका घरासमोर मोटार सायकलसह थांबलेल्या इसमाला विश्वासात घेऊन विचारपूस केली असता त्याने त्याचे नाव




१) उद्धव पांडुरंग सूर्यवंशी, वय २३ वर्ष, राहणार घारोळा, तालुका चाकूर जिल्हा लातूर. असे असल्याचे सांगितले.

तसेच त्यांच्या ताब्यात असलेल्या वाहना संदर्भाने विचारपूस केली असता सांगितले कि, सदरची मोटरसायकल २०२३ मध्ये चाकूर येथील कोरे हॉस्पिटल समोरून तसेच इतर तीन मोटरसायकली लातूर जिल्ह्यातील वेगवेगळ्या ठिकाणाहून चोरी केल्याचे सांगितले

नमूद आरोपीकडून चोरीच्या चार मोटारसायकली ज्याची एकूण किंमत १ लाख ५ हजार रुपयाचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला.

पोलीस ठाणे चाकूर येथील एक मोटरसायकल चोरीचा गुन्हा उघडकीस आला असून उर्वरित तीन मोटार सायकल बाबत तपास सुरू आहे.

नमूद आरोपीला पोलीस ठाणे चाकूर येथे पुढील कार्यवाहीस्तव ताब्यात देण्यात आले असून संबंधित पोलीस ठाणेचे पोलीस पुढील तपास करीत आहेत.

सदरची कामगिरी वरिष्ठांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संजीवन मिरकले यांचे मार्गदर्शनात सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रवीण राठोड,पोलीस अंमलदार सुधीर कोळसुरे, सिद्धेश्वर जाधव, राजेश कंचे, प्रकाश भोसले, मोहन सुरवसे, योगेश गायकवाड, चालक पोलीस अमलदार चंद्रकांत केंद्रे यांनी पार पाडली.

# सूर्यनारायणाचा वाढतोय प्रकोप, सावधान!(उन्हाळा: रखरखीत ऊन विशेष.)

उन्हाळ्यातील कडक ऊन त्वचेसाठी खूप हानिकारक आहे. सूर्याच्या तीव्र किरणांमुळे आपल्या त्वचेला सनबर्न, टॅनिंग आणि मुरुमांसारख्या समस्या उद्भवू लागतात. उन्हामुळे आपला चेहराही कोरडा आणि निर्जीव दिसू लागतो. यंदा सन २०२४साली खुप कडक उन्हाळा असण्याची लक्षणे दिसू लागली आहेत. वाटते की सूर्यनारायण आग ओकत आहे की काय? त्यामुळे आपणच आपली काळजी घेणे इष्ट ठरणार आहे. खबरदारीचा इशारा देणारा श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजींचा सदर लेख सेवेत... संपादक.

यावर्षी एवढे भयंकर कडक ऊन पडत आहे. झाडांची कोवळी-ओली-हिरवी पाने दुपारी चिंबलेली दिसत आहेत. ऊन्हात फिरल्यास ऊन्हाचे असह्य चटके बसत आहेत. मागील मार्च महिन्यातच असे हाल होते. गर्दीचे रस्ते निर्जन दिसत असत. त्यामुळे स्वतःच्या आरोग्याची चिंता प्रत्येकांनी स्वतःच घेणे अत्यावश्यक वाटत आहे. आता एप्रिल अखेर आणि मे महिन्यातील तापमानाची तीव्रता यंदा मार्च महिन्यापासूनच जाणवायला लागली. तापमानाने चाळीशी पार केली असून राज्यात उष्णतेची लाट भडकली आहे. अधेमध्ये अवकाळी पाऊसही धुमाकूळ घालत आहे, मात्र उष्णता नावालाच कमी होत आहे. उष्माघात म्हणजे उष्णतेचा आघात होय. इंग्रजीत त्याला सनस्ट्रोक म्हणतात. या व्याधीत सुरुवातीला चक्कर, डोकेदुखी, मळमळ-उलटी, पोटात वेदना, गोंधळलेली अवस्था ही सामान्य लक्षणे रुग्णामध्ये पहायला मिळतात. याकडे दुर्लक्ष केल्यास जीवही गमवावा लागतो. जास्त वेळ उन्हात काम केल्याने शारीरिक समस्या निर्माण होऊ शकते. त्यातील गंभीर प्रकार म्हणजे उष्माघात- हिट एक्झॉशन आणि उष्माघात- हिट स्ट्रोक होय. सतत कडाक्याच्या उन्हात काम केल्यानंतर उष्माघात होतो. त्यातून होणारी तीव्र समस्या म्हणजेच उष्माघात होय. शरीराने मर्यादेपेक्षा जास्त उष्णता निर्माण केली किंवा उष्णता शोषून घेतली तर हायपरथर्मिया म्हणजेच अतिउच्च तापमानाचा आजार होतो. उष्माघात हा त्याचाच एक प्रकार आहे. बाहेरचे तापमान प्रमाणाबाहेर वाढले की शरीरातील तापमान नियंत्रित करण्याची यंत्रणा कोलमडते. ऊन आणि गरम हवेच्या झोतामध्ये काम करावे लागले किंवा तीव्र उष्णतेच्या संपर्कात गेल्यास शरीरातील तापमान नियंत्रित करणारी हायपोथॅलॅमसमधील यंत्रणा कोलमडून पडते आणि उष्माघात होतो. उष्माघात होण्याचे नेमके कारण म्हणजे शरीरातून बाहेर पडणाऱ्या उष्णतेहून शोषलेली उष्णता अधिक असते. यामुळे शरीराचे तापमान वाढते. उष्माघात झाल्यानंतर तातडीची वैद्यकीय सेवा मिळाली नाही तर मृत्यू ओढवतो. उष्माघात आणि ताप येणे या भिन्न प्रक्रिया आहेत. ताप येण्यामध्ये शरीराचे तापमान नेहमीहून अधिक राहते. व्याख्येप्रमाणे उष्माघात म्हणजे शरीराचे तापमान ३८.१ पेक्षा अधिक किंवा त्याहून अधिक तापमानाला स्थिर राहणे. सामान्यपणे दुपारी शरीराचे तापमान ३७.७० सेल्सिअस असते. उष्माघातामध्ये हे तापमान ४० सेल्सिअस होऊन ते जीवघेणे ठरते.

जास्त तापमानामुळे शरीरातील महत्त्वाचे अवयव निकामी होतात. उष्माघात हा प्रामुख्याने अर्भकं, लहान मुलं, वयोवृद्ध, पाणी कमी पिणारे लोक, दीर्घ आजारी किंवा मद्यप्राशन करणाऱ्यांमध्ये आढळतो. तसेच हृदयरोग, फुप्फुसांचे आजार, मूत्रपिंडाचे आजार, लठ्ठपणा, उच्च रक्तदाब, मधुमेह, मानसिक व्याधीसारख्या आजारांनी त्रस्त व्यक्तींनाही सहज उष्माघात होऊ शकतो. खेळाडूंना आणि बराच वेळ आउटडोअर काम करणाऱ्यांना उष्माघात होऊ शकतो. उष्माघाताची कारणे- अधिक प्रमाणात जंक फूड खाणे, आपल्याला घराबाहेर पडताच काहीतरी खायची इच्छा होते. उन्हात तर बाहेरचे अधिकच खात असतो. यामध्ये जंक फूडचे प्रमाणात अधिक असते. यामुळे उष्माघात आणि उष्मा, थकवा देखील होऊ शकतो. काही जंक फूडमध्ये मोनोसोडियम, ग्लूटामंट्ससह गरम आणि हानिकारक पदार्थ असतात. याचे सेवन केल्याने शरीरातील उष्णता वाढवते. ज्यामुळे शरीर उष्माघाताचा सामना करू शकत नाही. शरीरातील पाण्याचा अभाव हे उष्माघाताचे एक प्रमुख कारण समजले जाते. उन्हाळ्यात डिहायड्रेशनची अनेक प्रकरणे पाहिली जातात.

भर उन्हात कमी पाणी पिऊन घराबाहेर पडले तर उष्माघात तर होईलच तसेच पाण्याच्या अभावामुळे होणाऱ्या अनेक रोगांचाही आपल्याला सामना करावा लागू शकतो. अशा परिस्थितीत नारळ पाण्याचे सेवन नक्की केले पाहिजे. आपल्याला कोणत्या ना कोणत्या कारणाने भर उन्हात बाहेर पडावेच लागते. सूर्याची तीव्र किरणे तोंड आणि शरीराच्या इतर भागांना स्पर्श करतात, तेव्हा उष्माघात होण्याची शक्यता जास्त असते. कामानिमित्त बाहेर निघाल्याने आपल्याला हे सर्व सोसावे लागते. उष्णता टाळण्यासाठी डोके, तोंड आणि हात हलक्या कपड्याने झाकून ठेवावे. शक्य असल्यास छत्रीसह घराबाहेर पडलेले बरे. आपणास थायरॉईडची समस्या असेल तर उन्हात उष्माघात होण्याची शक्यता जास्त असते. थायरॉईड असमतोल झाल्यावर रक्तदाब बदलल्यास थकवा जाणवतो. अशा परिस्थितीत उन्हात जाणे टाळावे. उष्माघाताची लक्षणे- उच्च ताप, कमी रक्तदाब, चक्कर येणे, उलट्या होणे, स्नायूंमध्ये कडकपणा, सतत घाम येणे, अशक्तपणा, त्वचेवर पुरळ, बेहोश होणे, डोकेदुखी, श्वास घेण्यास समस्या, भीती आणि अस्वस्थता. उष्माघातापासून बचाव असा करावा- उन्हात बाहेर निघणे टाळावे, उन्हात बाहेर पडताना छत्री वापरावी, उन्हाळ्यात चहा-कॉफी किंवा गरम पदार्थ टाळावे, शरीरात तापमान सामान्य राखण्यासाठी पाण्याची कमतरता येऊ देऊ नये, दिवसातून दोन ते तीन लीटर पाणी प्यावे, दीर्घकालीन काम टाळावे, उष्माघात झाल्यास डॉक्टरांना भेटावे, साखर असलेले पेय पिणे टाळावे, खुले व हलके कपडे घालावे, बाहेर पडण्यापूर्वी सनस्क्रीन आणि सनग्लासेस वापरावे, संतुलित आणि पौष्टिक आहार घ्यावे, जेव्हा तीव्र सूर्यप्रकाश असेल तेव्हा व्यायाम किंवा सायकल चालविणे टाळावे. अशाप्रकारे आग ओकणाऱ्या सूर्यनारायणाच्या प्रकोपापासून आपण वाचू शकतो. अन्यथा बळी पडू यात मुळीच शंका नाही! !! रखरखीत उन्हाळ्याच्या सावधगिरीच्या इशाऱ्यासह हार्दिक हार्दिक शुभेच्छा !!

***********

**_ संकलन व सुलेखन -**<br>
**श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजी.**<br>
**रामनगर वॉर्ड, गडचिरोली.**<br>
**फक्त व्हॉट्सप- ९४२३७१४८८३.**

## ठसका

सत्याला सत्य म्हणण्याची भीती आहे<br>
असत्याचा मात्र बघा डंका किती आहे<br>
जनतेला लुबाडून खातो राज्यकर्ता पण<br>
खातो म्हणणाऱ्यांनाच शंका किती आहे<br>
योजना कागदावरच पण चर्चा बेफाम<br>
हीच तर बघा नेत्यांची कूटनीती आहे<br>
हक्क, अधिकार न मागणाऱ्या जनतेला<br>
जाती धर्मात गुरफटण्याची रगतपिती आहे<br>
एकाच नेत्याची जी हुजुरी करण्याची<br>
जनतेला लागली सवय किती आहे<br>
बदल हवा चेहरा नवा म्हणणाऱ्यांची<br>
बघाना झोळी मात्र नेहमी रीती आहे

*********

- विजय वाठोरे, हिमायतनगर नांदेड<br>
९९७५५९३३५९

## थकबाकीदारावर मनपा करणार कार्यवाही कर भरणा करण्याचे मनपाचे आवाहन

लातूर/ प्रतिनिधी: मालमत्ता कर हाच लातूर महापालिकेच्या उत्पन्नाचा प्रमुख स्त्रोत आहे. त्या दृष्टीने सालसन २०२३-२४ वर्षात मनपा तर्फे वसुली मोहिम राबविण्यात आली, ज्याअंतर्गत नागरिकांना विविध सवलती देण्यात आल्या व वेळोवेळी कर भरण्याचे आवाहन देखील करण्यात आले. त्यास बहुतांश मालमत्ताधारकांनी प्रतिसाद देऊन आपल्या कराचा भरणा करून मनपास सहकार्य केले.

परंतु, ३१ मार्च उलटूनही अद्यापही काही मालमत्ताधारकाकडे कर थकीत आहे. थकबाकिदार यांना थकीत रकमेवर दरमहा व्याज सुद्धा लागत आहे. यापूर्वी वारंवार सूचना, नोटीस देण्यात आलेल्या असूनही थकबाकीदार मालमत्ताधारक कर भरत नसल्याचे दिसून आल्याने त्याच्यावर सक्तीची कारवाई करण्याची भुमिका महापालिकेने घेतली आहे. याबाबत थकबाकिदार मालमत्ताधारकावर मालमत्ता अटकावणी (जप्ति) सारख्या कडक कार्यवाही करण्याच्या सुचना मनपा आयुक्त बाबासाहेब मनोहरे यांनी क्षेत्रिय कार्यालयांना दिले आहेत. तसेच थकबाकिदार मालमत्ता धारकांनी आपल्याकडील थकित कर आजच भरून, जप्तीसारखी होणारी कार्यवाही टाळावी व मनपा प्रशासनास सहकार्य करावे असे आवाहन मनपा आयुक्त बाबासाहेब मनोहरे यांनी नागरिकांना केले आहे

## वर्षभरात रेल्वेची रेकॉर्डब्रेक कमाई

नवी दिल्ली : भारतात आजही लांब पल्ल्याच्या प्रवासासाठी भारतीय रेल्वेला सर्वाधिक पसंती दिली जाते. दररोज लाखो लोक रेल्वेने प्रवास करतात. याद्वारे सरकारला मोठा महसूल मिळतो. यंदाही रेल्वेने प्रचंड महसूल मिळवला आहे. रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी दिलेल्या माहितीनुसार, २०२३-२४ या आर्थिक वर्षात रेल्वेने २.५६ लाख कोटी रुपयांचा महसूल मिळवला आहे. ही आतापर्यंतची विक्रमी पातळी आहे. वर्षभरापूर्वी हा आकडा २.४० लाख कोटी रुपये होता.रेल्वेमंत्र्यांनी(पूर्वीचे ट्विटर) वर केलेल्या पोस्टमध्ये म्हटले की, भारतीय रेल्वेने एफवाय २४ मध्ये १५९१ मिलियन टन मालवाहतूक केली. तसेच, ५३०० किमीचा नवीन ट्रॅकही टाकण्यात आला आहे. याशिवाय, वर्षभरात ५५१ डिजिटल स्टेशन सुरू करण्यात आले. अंतरिम अर्थसंकल्पानुसार, रेल्वेला २०२४-२५, या आर्थिक वर्षात २.५२ लाख कोटी रुपयांचा भांडवली खर्च प्राप्त होईल, जो एका वर्षापूर्वी वाटप केलेल्या २.४ लाख कोटी रुपयांपेक्षा ५ टक्के अधिक आहे.सवलती बंद केल्याचा फायदा यापूर्वी एका आरटीआयमध्ये असे समोर आले आहे की, ज्येष्ठ नागरिकांसाठी रेल्वे तिकिटावरील सवलत बंद केल्याने रेल्वेला फायदा झाला आहे. कोरोनापूर्वी रेल्वे तिकिट खरेदी करताना ज्येष्ठ नागरिकांना सवलत मिळायची. कोरोनानंतर ही सवलत बंद करण्यात आली. ही सवलत रद्द केल्यामुळे रेल्वेला सुमारे ५८०० कोटी रुपयांचा फायदा झाला. पूर्वी रेल्वे महिलांना भाड्यात ५० टक्के आणि ट्रान्सजेंडर श्रेणीतील पुरुष आणि ज्येष्ठ नागरिकांना ४० टक्के सवलत देत असे. ही सूट रद्द केल्यानंतर सर्वांना एकसमान भाडे द्यावे लागते.



# वंचितचा बारामतीत सुळेंना पाठिंबा, पुण्यात वसंत मोरेंना उमेदवारी

पुणे : वंचित बहुजन आघाडीने लोकसभा निवडणुकीसाठी आज आपली तिसरी उमेदवार यादी जाहीर केली आहे. या यादीत वंचितने पाच मतदारसंघांतील आपले उमेदवार जाहीर केले असून बारामती लोकसभा मतदारसंघात महाविकास आघाडीकडून मैदानात उतरलेल्या राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाच्या विद्यमान खासदार सुप्रिया सुळे यांना पाठिंबा देत असल्याची घोषणा करण्यात आली आहे. तसेच पुण्यातून वसंत मोरे यांना वंचित बहुजन आघाडीने उमेदवारी घोषित केली आहे.वंचितने आज उमेदवार जाहीर केलेल्या मतदारसंघांमध्ये परभणी बाबासाहेब उगले, नांदेड अविनाश बोसीकर, छत्रपती संभाजीनगर ( औरंगाबाद) अफसर खान, पुणे वसंत मोरे आणि शिरूर मंगलदास बांदल या पाच जागांचा समावेश आहे. शिरूरमधून वंचितने मंगलदास बांदल यांना उमेदवारी दिली आहे. मंगलदास बांदल हे मागील लोकसभा निवडणुकीमध्ये राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये होते. मात्र मागील काही दिवसांपासून ते भाजपच्या स्टेजवर दिसत होते. तसंच त्यांनी नुकतीच भाजप नेते आणि राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचीही भेट घेतली होती.

परंतु आता वंचित आघाडीने त्यांना शिरूर लोकसभा मतदारसंघातून उमेदवारी जाहीर केली आहे. शिरूरमध्ये विद्यमान खासदार अमोल कोल्हे आणि माजी खासदार शिवाजीराव आढळराव पाटील यांच्यात सामना रंगत असताना आणखी एका उमेदवाराची एंट्री झाल्याने शिरूरची लढत तिरंगी होणार अ हे.

# ८ मध्यम प्रकल्पांत ८ टक्केच पाणीसाठा


लातूर : प्रतिनिधी यंदा सूर्य आग ओकत आहे. त्यामुळे बाष्पीभवनाचा वेग वाढला आहे. परिणामी जिल्ह्यातील तावरजा, व्हटी, रेणापूर, तिरु, देवर्जन, साकोळ, घरणी आणि मसलगा या ८ मध्यम प्रकल्पांत केवळ ८.६१ टक्के पाणीसाठा शिल्लक आहे. मध्यम प्रकल्पांतील पाणीसाठ्यात झपाट्याने त होत असून तावरजा, व्हटी आणि तिरु या मध्यम प्रकल्पांतील प्रत्यक्षात उपयुक्त पाणीसाठा जोत्याखाली गेला आहे.मागणच्या वर्षी लातूर जिल्ह्यात अल्प पर्जन्यमान झाले. भरवश्याचा परतीचाही पाऊस पडला नाही. लातूर शहराला पाणीपुवठा होणा-या केज तालुक्यातील धनेगाव येथील मांजरा धरणाच्या पाणलोट क्षेत्रातही समाधानकारक पाऊस पडला नाही. परिणामी मांजरा, तेरणा, रेणा, तिरुसह जिल्ह्यातील अन्य नद्या वाहिल्या नाहीत. या नद्यांवर असलेल्या मध्यम प्रकल्पांत अपेक्षित प्रमाणात पाणीसाठा झाला नाही.

# महाविकास आघाडी घटक पक्षाचे गावातील पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी एकत्रितपणे डॉ. शिवाजी काळगे यांचा प्रचार करावा- माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख

लातूर /प्रतिनिधी :- महाविकास आघाडी घटक पक्षाचे गावातील पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी एकत्रितपणे फिरून आपल्या गावात मतदारांना उमेदवार डॉ. शिवाजी काळगे यांचा परिचय करून द्यावा. केंद्रातील आणि राज्यातील सत्ताधाऱ्यांनी गेल्या १० वर्षात राज्यात आणि देशात किती वाईट परिस्थिती निर्माण केली आहे, हे आपण पाहतोय आणि भोगतोय हेच आपल्याला मतदारपर्यंत जाऊन सांगावे लागेल, असे प्रतिपादन राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण सांस्कृतिक कार्यमंत्री व लातूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी कासारगाव, बोरवटी, हणमंतवाडी व नांदगाव येथील बैठकीत केले आहे. लातूर लोकसभेकरीता डॉ. शिवाजी काळगे यांच्या रूपाने सुशिक्षित, सुसंस्कृत आणि जनतेला सहज उपलब्ध होणारा उमेदवार दिला आहे, त्यांना भरघोस मताने विजयी करावे असेही आवाहन त्यांनी या विविध बैठकीतून केले. लातूर लोकसभेचे उमेदवार महाविकास आघाडी काँग्रेस पक्षाचे अधिकृत उमेदवार डॉ. शिवाजी बंडाप्पा काळगे यांच्या प्रचारार्थ राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण सांस्कृतिक कार्यमंत्री व लातूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी मंगळवार दि. २ एप्रिल रोजी सायंकाळी कासारगाव, बोरवटी, हणमंतवाडी व नांदगाव येथे जाऊन ग्रामस्थांशी संवाद साधला. यावेळी त्यांच्या सोबत लातुर शहर जिल्हा काँग्रेस अध्यक्ष किरण जाधव, लातूर तालुका काँग्रेस कमिटीचे तालुकाध्यक्ष सुभाष घोडके, व्हा. चेअरमन समद पटेल, चेअरमन, पक्ष निरीक्षक सर्जेराव मोरे, काँग्रेस सेवादलचे रमेश सुर्यवंशी, प्रा.राजाभाऊ माने, विजयकुमार साबदे, राजकुमार पाटील, अकबर माडजे आदी पदाधिकारी उपस्थित होते. कासारगाव येथील बैठकीस गोपाळ भंडे, जयदेव मोहिते, बाळासाहेब भगाडे, बोरवटी येथे रावसाहेब लकडे यांच्या निवासस्थानी झालेल्या बैठकीस सरपंच सौ. अनुजा नाथजोगी, विजयकुमार साबदे, पिराजी साठे उपस्थित होते. तर नांदगाव येथे धोंडोपंत कुलकर्णी यांच्या निवासस्थानी झालेल्या बैठकीस आनंद पाटील, रोहित पाटील, बापूसाहेब साळुंके, रायवाडी येथे ग्रामपंचायत सरपंच प्रशांत पवार, प्रकाश पवार यांच्यासह रायवाडी ग्रामस्थ उपस्थित होते. सरकारला धडा शिकवण्याची वेळ आता आली आहे देशात अनेक महत्वाच्या प्रश्नाकडे दुर्लक्ष करून देशातील आणि राज्यातील सरकार जाहीराजीवर वारेमाप खर्च करीत आहे. सर्वसामान्य माणसाच्या खिश्यातून, आपल्या कडून वसूल केलेल्या कराच्या पैशातूनच हा सर्व खर्च केला जात आहे. सरकारच्या या नाकर्ते पणामुळे महागाई वाढली आहे. सर्वसामान्य माणसाला महागाईमुळे स्वतःच्या गरजा भागविण्यासाठी कसरत करावी लागत आहे. दुसरीकडे भृष्टाचार मोठ्या प्रमाणात फोफावला आहे. अशी परिस्थिती वास्तवात असताना विद्यमान सरकार सर्वसामान्य जनतेचे आहे, असा आव आणत आहे. यामुळे सरकारला धडा शिकवण्याची वेळ आता आली आहे. हे सर्व थांबवण्यासाठी दृष्टिहीन आणि दृष्टीदाता आशा प्रकारे होत असलेल्या या निवडणुकीत आपण डॉ. शिवाजी काळगे यांना प्रचंड मताधिक्यांने विजयी करावे असे आवाहन कासारगाव येथे बोलतांना माजी मंत्री आमदार अमित देशमुख यांनी केले आहे. बोरवटी ग्रामस्थांकडून महाविकास आघाडीचे डॉ. शिवाजी काळगे यांना प्रचंड मताधिक्य देण्याचा निर्धार लातुर लोकसभा निवडणुकीच्या निमित्ताने महाविकास आघाडी काँग्रेस पक्षाचे उमेदवार डॉ शिवाजी काळगे यांनी लोकसभा मतदारसंघात प्रचार आणि संवाद बैठकांचा धडाका उडवून दिला असून याचाच एक भाग म्हणून लातुर तालुक्यातल्या बोरवटी येथील रावसाहेब लकडे यांच्या निवासस्थानी राज्याचे माजी मंत्री अमित विलासराव देशमुख यांनी ग्रामस्थ, मतदार बंधूभगीनीशी संवाद साधला. यावेळी बोलताना माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी लातुर लोकसभा मतदार संघातील महाविकास आघाडी काँग्रेस पक्षाचे उमेदवार डॉ. शिवाजी काळगे यांचा डोअर टू डोअर जाऊन प्रचार करावा आणि प्रचंड मतांनी निवडून आणावे असे आवाहन त्यांनी यावेळी उपस्थित ग्रामस्थांना केले. यावेळी बोरवटी ग्रामस्थांनी महाविकास आघाडीचे उमेदवार डॉ. शिवाजी काळगे यांना मताधिक्य देण्याचा निर्धार केला. यावेळी गावातील पाणी पुरवठा, विविध विकास कामे, निधीची उपलबद्धता, गावाच्या पाटीवर एसटी बस थांबा, शेतीमाल उत्पादन खर्च व शेतीमाल भाव, लातुर बाजार समिती मध्ये गावातील शेतकऱ्यांना येणाऱ्या अडचणी, कोल्हापुरी बंधाऱ्याच्या निधी उपलब्धता, महावितरण पोल उभारणे यासह बोरवटी गावातील विविध प्रश्न जाणून घेत ग्रामस्थांसमवेत चर्चा केली. महाविकास आघाडी घटक पक्षाच्या पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी गावात एकत्रितपणे उमेदवार डॉ. शिवाजी काळगे यांचे कार्य करावे नांदगाव येथे बोलतांना माजी मंत्री आमदार अमित देशमुख म्हणाले, लोकसभा निवडणूक २०२४ प्रचाराची रणधुमाळी आता वाढत चालली असून लातुर लोकसभा मतदारसंघातील महाविकास आघाडी काँग्रेस पक्षाचे अधिकृत उमेदवार डॉ. शिवाजी काळगे यांनी लातुर लोकसभा मतदारसंघातील शहरी व ग्रामीण दोन्ही ठिकाणी संवाद बैठकांचा धडाका उडवुन दिला असून मतदारसंघात देखील त्यांना चांगला प्रतिसाद मिळत असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे असे सांगीतले. यावेळी पूढे बोलताना माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख म्हणले की, आपल्या गावात महाविकास आघाडी घटक पक्षाच्या पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी एकत्रितपणे फिरून मतदारांना उमेदवार डॉ. शिवाजी काळगे यां चा परिचय करून द्यावा, विरोधी पक्षांनी गेल्या १० वर्षात राज्यात आणि देशात किती वाईट परिस्थिती निर्माण केली आहे, हे आपण पाहतोय आणि हेच आपल्याला मतदारपर्यंत जाऊन सांगावे लागेल. आपला उमेदवार हा उच्च शिक्षित व वैद्यकीय क्षेत्रात २५ वर्षे कार्य करण्याचा अनुभव, दांडगा जनसंपर्क, उमेदवार स्थानिक आहे याचीही माहिती प्रत्येक मतदारापर्यत पोहोचवावी आणि सर्वाधिक मताधिक्यांने डॉ. शिवाजी काळगे यांना निवडुन द्यावे असे आवाहन उपस्थिताना केले. यावेळी बोलताना गावातील युवकांनी समस्या मांडताना विदयार्थ्यांना लातूरला जाण्यायेण्यास सिटीबस सुरू करावी, गावात वाचनालय सुरू करावे, ग्रामपंचायत इमारत जीर्ण झाली असून नूतन इमारतीसाठी निधी उपलब्ध व्हावा, निराधार अनुदान देणाऱ्या जिल्हा बँकेची शाखा बदलून मिळावी, अशी मागणी करत डॉ. शिवाजी काळगे यांना गावातून सर्वाधिक मताधिक्य देण्याचा निर्धार यावेळी ग्रामस्थांनी व्यक्त केला. या बैठकीत प्रा. राजाभाऊ माने यांनी प्रास्तविक केले. राज्यातील सरकारने जनतेची फसवणूक केली पक्ष फोडण्यात सत्ताधारी व्यस्त सामान्य माणसाच्या गरजाचे काय रायवाडी येथील बैठकीत बोलतांना माजी मंत्री आमदार अमित देशमुख म्हणाले, शासनाने मराठा आरक्षण देण्याचा कायदा केला पण सभागृहात चर्चा केली नाही, ही भूमिका म्हणजे कुठेतरी संशय निर्माण करणारी आहे आणि म्हणूनच आजही जरांगे पाटील यांचे आंदोलन सुरूच आहे. या सरकारने मराठा आरक्षण यासोबतच जनतेला दिलेली इतर आश्वासने देखील पूर्ण केले नाहीत व राज्यातील जनतेची या सरकारने फसवणूक केली असेच म्हणावे लागेल. मणिपूर सारख्या घटनेवर सरकार बोलत नाही, दिल्लीचे मुख्यमंत्री केजरीवाल यांच्यावर कारवाई करणे, सूडबुद्धीने कारवाया करणे, यापलिकडे केंद्र सरकारने काही केले नाही. पक्ष फोडण्यात सत्ताधारी व्यस्त आहेत. पण सामान्य माणसाच्या गरजा काय आहेत याकडे लक्ष दयायला सरकारला वेळ नाही. या सद्याच्या राज्यातील व केंद्रातील कृत्याला जनता वैतागली असून जनतेत तीव्र संताप व्यक्त केला जात आहे, आणि हाच सरकार विरोधी संताप या लोकसभा निवडणुकीत महाविकास आघाडीच्या उमेदवाराला मत देऊन सरकार विरोधात व्यक्त करावा असे म्हणत डॉ. शिवाजी काळगे यांना विजयी करावे असे आवाहन रायवाडी ग्रामस्थांना यावेळी माजी मंत्री, आमदार अमित देशमुख यांनी केले. दरम्यान गावातील सभागृहाची डागडुजी करावी, गावातील उर्वरित अंतर्गत रस्ते व्हावेत, रायवाडी ते नागझरी रस्ता करून घ्यावा, गावातील युवकांच्या हाताला काम द्यावे अशी मागणी ग्रामस्थांनी चर्चेदरम्यान केली त्याला सकारात्मक प्रतिसाद माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी यावेळी ग्रामस्थांना दिला, यावेळी भारत मस्के यांनी मनोगत व्यक्त केले

# वारा आला, पाऊस आला की वीज होते गायब

किनवट.ता.प्रतिनिधी. (शेख शौकत) वारा आला की वीज जाते. ढगाळ वातावरण झाले आणि पाऊस पडण्यापूर्वीच वीज जाते. शहरात व ग्रामीण भागात ही समस्या कायमची असल्याने या समस्येतून ग्राहकांची सुटका कधी होणार? असा प्रश्न ग्राहक विचारत आहेत. विद्युत वितरण कंपनीच्या कर्मचारी असो अधिकारी फोनवर संपर्क केले संपर्क तुटतो अशी चर्चा खेडे पाड्यात चालू आहे.



पावसाळा, हिवाळा असो की उन्हाळा विजेच्या समस्येने ग्राहक त्रस्त आहेत. घरगुती वापरासाठी विजेचा वापर करणारे ग्राहक असोत की कृषिपंप चालवणारे शेतकरी असोत, विजेमुळे सर्वांनाच गैरसोयीचा सामना करावा लागत आहे. अधूनमधून अवकाळी पाऊस अन् उकाडा जाणवत आहे. त्यातच विजेचा लपंडाव यामुळे पंखे, कुलर व थंड हवा देणारी उपकरणे बंद पडत असून, प्रचंड उकाड्याचा सामना करावा लागत आहे. कधी-कधी तर ग्रामीण भागात बारा ते पंधरा तास वीज गायब असते. यामुळे विजेवरचालणारेसर्वव्यवहारठप्पहोतात.मोबाइलला चार्जिंग होत नसल्याने ते स्विच ऑफ होऊन खेळणे उन्हाळा जाणव लागला. त्यातच बनत असल्याचे चित्र आहे.

# किनवटच्या जंगलात मोहाच्या फुलांचा हंगाम सुरु

किनवट.ता.प्रतिनिधी. (शेख शौकत) आदिवासींचा कल्पवृक्ष म्हणून सुपरिचित असलेल्या मनमोहक मोहाच्या फुलांचा हंगाम सुरु झाला असून यामुळे भर उन्हाळ्यात आदिवासींना रोजगार उपलब्ध झाला आहे. सध्या भल्या पहाटे आदिवासी कुटुंब मोहफुलांची वेचणी करून घरी आणून त्यांना सावलीत वाळू घालताना दिसत आहेत. साधारणतः एका झाडापासून दररोज १० ते २० किलोपर्यंत कच्ची मोहफुले मिळतात. किनवटच्या जंगलात अनेक औषधी वनस्पती दिसून येतात. यामध्ये मोह फुलांचा आयुर्वेदिक औषधी म्हणून वापर होतो. तालुक्यातील वनात मोहाचे वृक्ष मोठ्या प्रमाणात आढळून येतात. साधारणतः चैत्र पौर्णिमेपासून मोहाची झाड फुले व फळांनी बहरतात. मोह हा पानगळती प्रकारातला मोठा वृक्ष आहे. रात्री उमलणाऱ्या मोहाच्या फुलांनी बहरलेल्या झाडावरून पहाटे पासून फुले पडण्यास सुरुवात होते. या काळात मनाला तरारी देणारा, उत्साह वाढवणारा मनमोहक मोहाच्या फुलांचा सुगंध संपूर्ण रानावनात दरवळतो. साधारणतः एक झाड हजाराहून अधिक फुले देते. जमिनीवर सड्यासारखी पडलेली फुले वेचण्यासाठी आदिवासी कुटुंब आबालवृद्धांसह रानात दाखल होतात. मोहाची फुले वेचण्यासाठी कुटुंबातील सर्वच सदस्य उन्हातान्हाची व हिंस्र श्वापदांचीही पर्वा न करता गर्क असल्याचे चित्र दिसते. आदिवासी बांधव आपल्या उपजीविकेचे साधन म्हणून वर्षभर मोहाच्या वृक्षांची देखभाल करतात. हक्काने फुले गोळा करून, त्यातून आपला चरितार्थ चालवितात. साधारणतः



महिनाभर आदिवासी बांधवांना उदरनिर्वाहाचे साधन म्हणून मोहाची वृक्ष महत्वाची भूमिका बजावतात. मोहाच्या वृक्षाचे अनेक फायदे असून आदिवासी बांधव या मोह वृक्षास आयुर्वेदिक वनस्पती म्हणूनही वापरतात. अनेक औषधी गुणधर्म असलेल्या मोहाच्या फुलांचा वापर खाण्याच्या पदार्थांमध्ये मोठ्या प्रमाणात करण्यात येतो. मोहाच्या फुलांमध्ये साखर आणि अल्कोहोलचे प्रमाण चांगल्याप्रकारे असते. शुद्ध अर्काचा खोकल्यासाठी औषध म्हणून उपयोग होतो. मोहाच्या बियांना 'टोरी' म्हणतात. या बियांपासून तेलही काढले जाते. या तेलाचा वापर स्वयंपाकासाठी केला जातो. मोहाच्या बियांची जी पेंड उरते तिला जाळल्याने डासांपासून संरक्षण मिळते. फुलांमध्ये कॅल्शियम जीवनसत्वे व पोषक द्रव्ये भरपूर प्रमाणात असतात. तसेच फुलांचा वापर शुद्ध अल्कोहोल मिळविण्यासाठीही केला जातो. कच्ची फुले वेचून ती २-३ दिवस वाळवून स्थानिक बाजार पेठेत ३५ ते ४० रुपये प्रती किलो दराने घावूक व्यापाऱ्यांना विकली जातात. दिवस भरात साधारणतः एका वृक्षापासून १० ते २० किलो मोहाची फुले मिळतात. गर्भवती आणि स्तनदा मातांना मोह हे उत्कृष्ट पोषण स्त्रोत आहे. यातून त्यांना चांगला पोषण आहार मिळतो. मोहापासून अनेक घरगुती वापरासाठीची उत्पादने तयार करता येतात. कोरडवाहू शेतीची कामे आटोपल्यानंतर ग्रामीण आदिवासींसाठी 'मोहफूल' हे उत्पनाचे साधन आहे. मोहफुलाचे आदिवासी बांधवांच्या जीवनातील महत्व ओळखून राज्य शासनाने २०२१ मध्ये मोहफुलांवरील निर्बंध हटविले असून तसा शासननिर्णय झालेला आहे. आदिवासी कुटुंबाचे राहणीमान व जीवनमान उंचावण्यासाठी मानव विकास कार्यक्रमाअंतर्गत 'मोहफूल- आदिवासी उपजीविकेचे एक साधन' हा प्रकल्प राबविण्यास राज्य शासनाने याआधीच मंजुरी दिली आहे.

# आरोपींना अटक करा अन्यथा आत्मदहन करणार...!



अहमदपूर :- जातीवाचक शिवीगाळ करून बेदम व अमानूश मारहाण करून जीवे मारण्याचा प्रयत्न केलेले आरोपी डॉ. प्रमोद घुगे यास अटक करून कठोर कारवाई करण्यात यावी अन्यथा आत्मदहन करण्याचा ईशारा उपविभागीय अधिकारी कार्यालय अहमदपूर येथे लहुजी शक्ती सेना यांच्या वतीने निवेदन देण्यात आले. लातूर येथे डॉ.घूगे यांच्या विरोधात गुन्हा दाखल झाला आहे.मात्र अद्याप त्यास अटक करण्यात आले नाही.येत्या ८ एप्रिल पर्यंत आरोपीस अटक झाली नसल्यास लहुजी शक्ती सेना तालूका शाखा अहमदपूर यांच्याकडून आत्मदहनाचा इशारा प्रशासनास देण्यात आला आहे. यावेळी लहुजी शक्ती सेनेचे अध्यक्ष मूकूंद वाघमारे,मंगेश कोमले,दत्तात्रय वाघमारे,सूनिल कोमले,गजानन कोमले,अर्जुन कासराळे,संग्राम बेले,विजय नामपल्ले,अनिल गूंडीले,विशाल डावरे आदींची उपस्थीती होती.

# नागपूर-नांदेड विमानसेवा लवकरच सुरू होणार

नागपूर : नागपुरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय विमानतळावरूननागपूर-नांदेड विमानसेवा १ एप्रिलपासून सुरू होण्याची शक्यता वर्तवली जात होती, मात्र स्टार एअरने ती तूर्तास पुढे ढकलली असून आता लवकरच सुरू होणार आहे.
कंपनीने विमानसेवा सुरू करण्याचा प्रस्ताव नागपूर विमानतळाचे संचालन करणाऱ्या मिहान इंडिया लिमिटेडला (एमआयएल) दिला होता. एमआयएलने तो प्रस्ताव दिल्लीतील स्लॉट समन्वय समितीसमोर ठेवला. त्यावर निर्णय होऊन कंपनीला विमानाच्या उड्डाणासाठी वेळ मिळाली आहे.
दोन वर्षांपूर्वी एप्रिलमध्येच उपराजधानीतून पहिले आरसीएस विमान नागपूर ते बेळगाव सुरू झाले. यावर्षी एप्रिलमध्येच नागपूर ते नांदेड विमान सुरू होण्याची शक्यता होती आणि स्टार एअरने एप्रिल-२०२३ पासून नागपूर ते बेळगावसाठी आठवड्यातून दोन दिवस (शनिवार आणि मंगळवार) उड्डाणे सुरू केली होती. एक वर्षानंतर किसनगडपर्यंत मार्ग जोडण्यात आला. नागपूर ते किशनगड आणि बेळगावपर्यंतची उड्डाणे आठवड्यातून चार दिवस उपलब्ध झाली आहेत.
स्टार एअर सध्या बेंगळुरू, हैदराबाद आणि हिंडन (उत्तर प्रदेश) येथून नांदेडसाठी उड्डाणे चालवते. या तीनपैकी कोणताही एक मार्ग नागपूरशी जोडून विमान कंपनी नांदेडला विमानसेवा सुरू करू शकते. कंपनीचकडे एम्बरर-१४५ ही विमाने आहेत.

# राष्ट्रवादी युवक प्रदेशाध्यक्ष सुरज चव्हाण यांच्या उपस्थितीत सुरत शहावली दर्गा येथे इफ्तार पार्टीचे आयोजन.

लातूर - राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या वतीने जुन्या गावभागातील सुरत शहावली दर्गा येथे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अजित पवार गटाचे राष्ट्रवादी युवक प्रदेशाध्यक्ष सुरज चव्हाण यांची प्रमुख उपस्थितीत इफ्तार पार्टीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी राष्ट्रवादी युवक प्रदेशाध्यक्ष चव्हाण म्हणाले की राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीची भावना नेहमीच सर्वधर्म समभाव भाईचाऱ्यांची राहिली आहे. पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष अजित दादा पवार यांच्या नेतृत्वात पक्ष सर्व जाती धर्मांना एकत्र घेत वाटचाल करत आहे. यावेळी इफ्तार पार्टीला राष्ट्रवादी काँग्रेस शहर जिल्हाध्यक्ष मकरंद सावे,राष्ट्रवादी काँग्रेस प्रदेशसरचिटणीस मुर्तुजा खान, माजी नगरसेवक नवनाथ आल्टे, राष्ट्रवादी युवक काँग्रेस शहरजिल्हाध्यक्ष लाला सुरवसे, राष्ट्रवादी युवक काँग्रेस प्रदेशउपध्यक्ष इर्शाद सय्यद, प्रदीप गंगणे,विधान सभा शहरजिल्हाध्यक्ष इरफान शेख, कार्याध्यक्ष



प्रविणसिंह थोरात प्रदेश सरचिटणीस अकबर शेख, टिल्लू शेख , अल्पसंख्याक शहरजिल्हाध्यक्ष जहाँगीर शेख, अमित पाटील शुभम जाधव, शहर जिल्हाकार्याध्यक्ष अशिष कोकाटे,विधानसभा कायध्यक्ष खमर काझी,राष्ट्रवादी युवक काँग्रेस प्रदेशसचिव मुन्ना तळेकर, राष्ट्रवादी युवक काँग्रेस शहर जिल्हाउपध्यक्ष अतूल घोबाडे, आदींची उपस्थिती होती.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE